कार्यकारी अभियंता,

रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता.रोहा, जि.रायगड. पिन नं.४०२ ३०४.

दूरध्वनी क्र.०२१९४ - २५०८५७/२५०८८४, फॅक्स - ०२१९४ - २५०८५७

Email ID:- eerid24@gmail.com, eerid@rediffmail.com

कृपया जलसंपदा विभागाच्या संकेत स्थळास भेट द्या ➔ http://wrd.Maharashtra.gov.in

जा.क्र.रापावि/प्रशा-४/५९४/२०१६ दिनांक:- ०८/०२/२०१६.

प्रति,

व्यवस्थापक,
जे.एस.डब्ल्यु स्टील लि.,
मौजे डोलवी, ता.पेण,
जि.रायगड.

विषय:- अंबा प्रकल्पातून ४६.६६ दलली/दिन पाणी वापराचा करारनामा करणेबाबत.

संदर्भ:- १. मा.मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश, मुंबई यांचे पत्र जा.क्र.८९.०१/(२८/८९)/तां-५/२८५२, दि.०१/०८/२००२.
२. मा.मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश, मुंबई यांचे पत्र जा.क्र.इस्पात(पापु)/(२८/८९)/अ.क्र.६१(३)/तां-३/१३७१, दि.०५/०३/२०१३.
३. मा.मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश, मुंबई यांचे पत्र जा.क्र.मुअ/जसंविकोप्र/तां-४/४१, दि.०४/०१/१६.
४. कंपनीचे पत्र JSW/UTL/15-16/01, दि.14/07/2016.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र.१ अन्वये प्रदेश कार्यालयाने इस्पात इंडस्ट्रीज लि. कंपनीस दि.०१/०१/२००२ पासून पुढे औद्योगिक ३४.०० दलली/दिन + घरगुती ३.०० दलली/दिन + फळबाग ३.०० दलली/दिन असे एकूण ४०.०० दलली/दिन आरक्षणास मंजूरी दिलेली आहे. पुढे कंपनीने आवश्यकतेनुसार वेळोवेळी आरक्षणात बदल करुन घेतलेले आहेत. त्याप्रमाणे कंपनीसोबत करारनामे केलेले आहेत.

जे.एस.डब्ल्यु स्टील लि. कंपनीने त्यांचे दि.१४/०७/२०१५ च्या पत्रान्वये पाणी आरक्षणात बदल करुन मिळणेबाबत मा.मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश, मुंबई यांना विनंती केलेली होती. त्याअनुषंगाने मा.मुख्य अभियंता यांनी त्यांचे वरील संदर्भिय पत्र क्र.३ अन्वये मान्यता दिलेली आहे.

१. जे.एस.डब्ल्यु स्टील लि. - ४६.६६ दलली/दिन (१७.०३०९ दलघमी/वर्ष)
२. अंबा रिव्हर कोक लि. - ७.०० दलली/दिन (२.५५ दलघमी/वर्ष)

वर नमूद केल्याप्रमाणे प्रस्तुत पाणी वापराच्या परवानगीचे अनुषंगाने आता कंपनीसोबत अंबा प्रकल्पांतर्गत नागोठणे को.प.बंधाऱ्यातुन ४६.६६ दललि/दिन इतक्या बिगर सिंचन पाणी वापराबाबतचा करारनामा करण्यात येत आहे. करारनाम्यासोबत दोन महिन्याच्या बीलाइतकी अनामत रक्कम बँक गॅरंटी स्वरुपात रु.३,२७,८९,०००/- दिलेली आहे. करारनाम्याचा कालावधी दि.०४/०२/२०१६ ते ०३/०२/२०२२ असा सहा वर्षाचा राहील. यापुर्वी केलेला करारनामा रद्द करणेत येत आहे. तसेच अंबा रिव्हर कोक लि. या कंपनीचा स्वतंत्र करारनामा करणेत यावा.

प्रस्तुत करारनाम्यातील अटी व शर्तींचे अनुपालन करणे आपणांवर बंधनकारक आहे.

कार्यकारी अभियंता,
रायगड पाटबंधारे विभाग,
कोलाड.

सोबत:- करारनामा सत्यप्रत

प्रत:- उपविभागीय अभियंता, अंबाखोरे प्रकल्प उपविभाग क्र.१, कोलाड यांना माहितीसाठी रवाना.